आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ नोव्हेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात विशेष शहरांच्या निर्मितीसाठी प्राधिकरणांच्या जमिनीच्या वापराकरताच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- वन्य प्राण्यांचे हल्ले आणि धान पीकात पाणी साचण्यालाही प्रधानमंत्री पीकविमा योजनेचं संरक्षण मिळणार

- नवाब मलिक यांच्या विरुद्ध पीएमएलए न्यायालयाकडून आरोप निश्चित

- दिल्ली स्फोट प्रकरणातल्या आरोपीशी संबंध असलेल्या तिघांना मुंबई पोलिसांकडून अटक

**आणि**

- राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

**<><><><><>**

सिडकोसह राज्यातल्या विविध प्राधिकरणांकडे असलेल्या जमिनी आणि भूखंडांचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाच्या धोरणाला आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. मंत्रीमंडळ निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करणं हे धोरणाचं उद्दिष्ट आहे. त्यानुसार, संबंधित प्राधिकरणाला निविदा प्रक्रियेद्वारे सीडीओ, अर्थात बांधकाम आणि विकास परिचालक नेमता येणार आहे. त्याला विकसनाचे हक्क मिळतील. या सीडीओला निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी करता येईल, तसंच प्रकल्पातल्या सदनिका आणि व्यावसायिक मालमत्तेची विक्री करता येणार आहे.*

*बृहन्मुंबई उपनगरातल्या वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावर म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचं धोरणही निश्चित करण्यात आलं आहे. यातून मुंबई शहर आणि उपनगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परवडणारी घरं उपलब्ध होतील. या इमारतींमध्ये आधुनिक सुविधांनी युक्त सदनिका, लिफ्ट, प्रशस्त वाहनतळ, उद्यान, सभागृह, खेळाचे मैदाने, व्यायामशाळा, जलतरण तलाव, सीसीटीव्ही सुविधा यांचा समावेश आहे.)*

**<><><><><>**

तुकडेबंदी कायद्याचं उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहार आता निःशुल्क नियमित आणि कायदेशीर करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यपद्धती महसूल विभागानं निश्चित केली आहे. त्यानुसार, "तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार" हा सातबाऱ्यावरचा शेरा काढून टाकला जाईल, सातबाऱ्यावर नाव लागेल, यापूर्वी खरेदीचा फेरफार रद्द झाला असेल, तर तो पुन्हा तपासून मंजूर केला जाईल आणि खरेदीदाराचं नाव कब्जेदार म्हणून लावलं जाईल, इतर हक्कात नाव असेल तर ते आता मुख्य 'कब्जेदार' सदरात घेतलं जाईल.

या निर्णयाचा फायदा राज्यातल्या ६० लाख कुटुंबांना होणार आहे.

**<><><><><>**

ठाणे महापालिका हद्दीतल्या जे.एन.एन.यु.आर.एम. आणि बी.एस.यू.पी. योजनेतल्या प्रकल्पग्रस्तांना वैयक्तिक सदनिका करारनामा करताना एक टक्के मुद्रांक शुल्कात सवलत देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. यातल्या काही कुटुंबांना मिळणाऱ्या सदनिकांसाठी प्रत्येकी ५६ हजार ते १ लाख ३४ हजार इतका अधिभार भरावा लागणार होता. त्याऐवजी प्रतिदस्त १०० रुपये आकारण्याचा निर्णय घेतल्याचं शिंदे यांनी सांगितलं. या निर्णयाचा लाभ ठाणे विभागातल्या ६ हजार ३४३ गरीब कुटुंबांना होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात बिबट्यांकडून माणसांवर होणाऱ्या हल्ल्यांची समस्या राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे निर्देश मुख्यमंत्री

देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. माणसांवर बिबट्याचे हल्ले होण्याच्या वाढत्या घटनांबाबत आज मंत्रालयात मुख्यमंत्री फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली त्यावेळी बिबट्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी दोन रेस्क्यू सेंटर सुरु करणे,पोलिस आणि वनविभागाची गस्त तसंच रेस्क्यू टीम आणि वाहनांची संख्या वाढवणे, बिबट्यांना पकडण्यासाठी ड्रोनचा वापर, नरभक्षक बिबट्यांना शोधून त्यांची नसबंदी करणे अशा अनेक उपाययोजनांचे निर्देश देण्यात आले.

**<><><><>**

वन्य प्राण्यांचे हल्ले आणि धानाच्या पिकात पाणी साचणं यालाही आता प्रधानमंत्री पीकविमा योजनेचं संरक्षण मिळणार आहे. वन्यप्राण्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीला आता स्थानिक जोखीम म्हणून, तर धानाच्या पिकात पाणी साचून झालेल्या नुकसानीला स्थानिक आणीबाणी म्हणून मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिली. या अनुषंगानं राज्यं, पिकाचं नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांची यादी तयार करतील आणि ऐतिहासिक माहितीच्या आधारे प्रभावित जिल्हे किंवा विमा विभाग निश्चित करतील. नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या आत वीकविमा ॲपवरून शेतकऱ्यांना जिओटॅग असलेल्या फोटोंसह नुकसानीची माहिती द्यावी लागेल. हा निर्णय २०२६च्या खरीप हंगामापासून लागू होणार आहे.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बंडखोर अर्ज मागे घेतील, अशी अपेक्षा भाजपा नेते चंद्रशेखऱ बावनकुळे यांनी व्यक्त केली. काही अपक्षांनी अर्ज भरला आहे, मात्र त्यांना विनंती करून अर्ज मागे घ्यायला लावलं जाईल, असं बावनकुळे म्हणाले.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढाव्यात अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्यामुळे तिचं स्वागत केलं पाहिजे असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी सबुरीने घ्यावं असा सल्ला त्यांनी दिला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या इंडिया आघाडीतल्या प्रवेशाबाबत सपकाळ म्हणाले की, असा कोणताही प्रस्ताव राष्ट्रीय स्तरावर आला नसल्यामुळे याबाबत चर्चा करता येणार नाही.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नाशिकमधले नेते अद्वय हिरे यांनी आज भाजपामधे प्रवेश केला. हिरे यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याविरोधात विधानसभा निवडणूक लढवली होती.

<><><><><>

कुख्यात गुन्हेगार दाऊद इब्राहीमच्या टोळीशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या विरुद्ध पीएमएलए न्यायालयाने आज आरोप निश्चित केले. मुंबईत कुर्ला इथल्या गोवावाला कंपाऊंडमधल्या ३ एकर जागेचा ताब अवैधपणे घेतल्या प्रकरणी त्यांच्यावर आरोप ठेवला आहे. या प्रकरणी ईडीनं केवळ तर्काच्या आधारे आपल्यावर आरोप ठेवले असून त्यातून मुक्त करावं, अशी मागणी करणारा नवाब मलिक यांचा अर्ज न्यायालयानं फेटाळला.

<><><><><>

दिल्ली स्फोट प्रकरणातील आरोपीशी संबंधित असलेल्या तिघांना मुंबई पोलिसांनी अटक केली असून त्यांना चौकशीसाठी दिल्लीला पाठवण्यात आलं आहे. अटक केलेले तिघेही समाजमाध्यमाद्वारे आरोपींच्या संपर्कात होते, असं पोलिसांनी सांगितलं. या प्रकरणी राज्यातल्या इतर जिल्ह्यातही तपास सुरू आहे.

या प्रकरणातील आरोप डॉक्टर उमर मोहम्मद याने तीन महिन्यांपूर्वी संभाषण करण्यासाठी समाजमाध्यमावर एक ग्रुप बनवल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><>**

नवी दिल्ली इथं आज झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आले. यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारने गौरवण्यात आलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. पाण्याचे स्रोत कमी असल्यानं पाण्याचा काळजीपूर्वक वापर करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

**होल्ड - राष्ट्रपती बाइट**

राज्य सरकारनं राबवलेल्या जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसंच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे, अशी भावना विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. याशिवाय उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य विभागात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम पुरस्कार पटकावला. तर सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था विभागात नाशिक जिल्ह्यातल्या कनिफनाथ जलवापर सहकारी संस्थेला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><>**

आंध्र प्रदेशात सुरक्षा दलांसोबत आज झालेल्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली मारले गेले. हिडमा याच्यावर एक कोटी रुपयांचं इनाम होतं. अनेक हिंसक कारवायांमधे हिडमाचा सहभाग असल्याचं पोलिसांनी सांगितलं. ठार झालेल्यांमधे हिडमा मडावीची पत्नी राजे हिचाही समावेश आहे. आंध्र प्रदेशामधल्या अल्लुरी सितारामा राजू जिल्ह्यात आज सकाळी सहा ते सातच्या दरम्यान, सुरक्षा दल आणि नक्षलींमधे चकमक झाली. त्यानंतर या

परिसरात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू असल्याचं पोलीस महासंचालक हरिश कुमार गुप्ता यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितलं.

**<><><><><>**

राज्याच्या काही भागात गारठा वाढला असून आज धुळ्यात सर्वात कमी, ६ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवलं गेलं. नाशिक जिल्ह्यात निफाड इथं ६ पूर्णांक ९, तर  नाशिक शहरात ९ पूर्णांक २ दशांश सेल्सिअस दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे भंडारा, गोंदिया जिल्ह्यात पारा १० अंश सेल्सिअसवर आला आहे. दिवसाही थंडी जाणवत असल्यानं नागरिक शेकोटीचा आधार घेत आहेत. तर बाहेर पडताना उबदार कपडे घालून निघालेले दिसत आहेत.

गेल्या चोवीस तासात मराठवाड्यात अनेक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातही तुरळक ठिकाणी किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**